संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# लहान मुलांचा खेळ हा अधिकार व्हावा

जगभरातला कुठलाही देश असो, कुठलाही समाज असो, प्रत्येकाच्या जीवन जगण्याच्या गरजा सारख्याच स्वरूपाच्या असतात आणि आताच्या आधुनिक जगात प्रत्येक देशाला आपल्या समाजाचे जनजीवन हे अधिक प्रगत आणि उन्नत असावे असे वाटत राहाते. त्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाचा उपयोग करून जीवनमानाचा स्तर अनेक पद्धतीने उंचावण्याचाही प्रयत्न होतो. विकसित देशांची विकासाची व्याख्या केवळ अर्थकारणापुरती मर्यादित राहात नाही. विज्ञान तंत्रज्ञानाच्या मदतीने सगळे देश वेगाने प्रगती करत आहेत. औद्योगिक दृष्ट्या किंवा एकूणच आपापल्या देशातील अर्थकारण मजबूत करण्यासाठी पायाभूत सुविधांचे प्रचंड जाळे निर्माण केले जाते. मग अगदी उत्तम दर्जाच्या रस्त्यांपासून ते अत्याधुनिक विमानतळांपर्यंत अशा एक ना अनेक घटकांचा त्यात समावेश होतो. परंतु केवळ या पायाभूत सुविधांमधून जीवनमानाचा स्तर उंचावतोच असे नाही. जीवन जगण्याच्या अन्य काही प्रेरणा आहेत की ज्या व्यक्तीच्या जन्मापासून ते त्याच्या अखेरीपर्यंत त्या महत्त्वाच्या वाटतात. वैयक्तिक स्तरावर घडून येणारा व्यक्तीमत्त्व विकास हा सामाजिक किंवा देशाच्यादृष्टीने सामूहिकरित्या तितकाच महत्त्वाचा ठरतो. त्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम खेळ क्रीडास्पर्धा आपापल्या भागातील लोकसंस्कृतीचे जतन, भूभागाचे संवर्धन, शेतीची मशागत अशा बऱ्याच गोष्टी जीवनमान उंचावण्यासाठी देखील गरजेच्या ठरतात. यातला अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे खेळ किंवा क्रीडा प्रकार हासुद्धा आहे. ज्यामधून खेळाडू किंवा क्रीडापटूंच्या नैपुण्याला वाव मिळतोच. परंतु लहानपणापासूनच खेळण्यासाठी उत्तम पद्धतीचे वातावरण निर्माण झाले तर लहानपणी झालेला हा खेळांचा सराव त्या त्या व्यक्तीच्या किंवा मुलाच्या व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो. विशेषतः लहान वयात खेळणे हा केवळ छंद किंवा आवड नसून तो अगदी तीन ते दहा बारा वर्षापर्यंतच्या मुलांचा तितकाच मूलभूत अधिकार ठरतो. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाने ११ जून हा दिवस लहान मुलांच्या खेळण्याचा अधिकार दिवस म्हणून लक्षात घेतला आणि आंतरराष्ट्रीय खेळ दिवस म्हणूनही तो स्वीकारला गेला.

### मैदानेच उपलब्ध नाहीत

हा विषय खेळापुरता मर्यादित राहात नाही. एकूण प्रत्येक समाजाच्या किंवा देशाच्या उत्तम जीवनमानाची मूलभूत गरज ठरते.२०१४ पासून हा आंतरराष्ट्रीय खेळ दिवस पाळला जातो. परंतु त्याच्याकडे तितक्या गांभिर्याने पाहिले जात नाही. भारतात तर लहान मुलांच्या खेळण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते. विकसित देशांनी लहान वयातच मुलांच्या खेळण्याच्या या अंगभूत गरजेला नेमकेपणाने ओळखले आणि मग शाळांमधल्या मैदानांपासून ते शिक्षणातल्या खेळकर पद्धतीपर्यंत खेळ या विषयाला महत्त्व दिले गेले. भारतात मात्र आजच्या अत्यंत विचित्र परिस्थिती पाहायला मिळते. लहान मुलांना भरपूर खेळता आले पाहिजे. हे वय त्यांचे खेळण्याचे असते. परंतु याच वयामध्ये लहान मुलांच्या या महत्त्वाच्या मुद्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. शाळांमध्ये मैदाने नाहीत. शहरांमधल्या गृहनिर्माण संस्थांमध्येदेखील अतिशय तुटपुंज्या खेळण्याच्या जागा असतात. मुंबईसारख्या महानगरात तर आज मैदानेच उपलब्ध नाहीत. तीच परिस्थिती आज देशातल्या सगळ्याच महानगरांची होते आहे. स्वाभाविकपणे ज्या वयात खूप खेळण्याची आवश्यकता असते. त्या वयात उत्तम प्रकारची संधीच मिळत नाही आणि मग कुठेतरी गल्लीबोळांमध्ये अंडर आर्म क्रिकेटसारख्या फुटकळ खेळांवर मुलांना समाधान मानून घ्यावे लागते. शाळांना तर मैदानेही उपलब्ध नसतात. तिथे होणारे शारीरिक शिक्षणाचे तास एक निव्वळ टाईमपास ठरतो. मुलांना पाहिजे तसे खेळता येत नाही म्हणून अनेक पालकांवर पैसे भरून खेळाच्या कोचिंगला पाठवण्याची वेळ येते. मोठ्या शहरांमधली मैदानेसुद्धा अनेक खाजगी संस्थांना भाडेपट्ट्यावर दिली जातात. स्वाभाविकपणे त्याठिकाणीसुद्धा लहान मुलांना खेळण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य उपलब्ध होत नाही. खेळ हा लहान मुलांचा मूलभूत अधिकार आहे हा विचारच आपल्याकडे स्वीकारला गेलेला नाही, संविधानातून कायद्यातून अनेक प्रकारचे हक्क आणि अधिकार दिले जातात. शिक्षणाचा हक्क दिला गेला. पण खेळण्याचा हक्क कायदेशीरपणे मिळू शकलेला नाही. प्रामुख्याने लहान मुलांच्या उपजत अशा खेळाच्या गुणांचा हा सर्वात मोठा अपमान ठरतो.

### मुलांच्या हातात मोबाईल

आज खेळांचे विविध प्रकार निघाले आहेत. क्रिकेटसारख्या खेळाने गल्लोगल्ली धुमाकूळ घातलेला आहे. शेकडो स्पर्धा होत असतात. म्हणजेच तरुण वयातल्या सर्व प्रकारच्या खेळ प्रकारांना आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झालेली आहे. देशादेशांमध्ये होणाऱ्या क्रीडा स्पर्धा राष्ट्रकुल स्पर्धा, ऑलिंपिक स्पर्धांचा समावेश होतो. खेळांमधून तरुणांमधल्या खिलाडूपणाला उत्तेजन दिलेही जाते. यासाठी ६ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय खेळ आणि शांतता दिवस म्हणूनही पाळला जातो. कारण क्रीडास्पर्धांच्या माध्यमातून सामंजस्यपूर्ण वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. परंतु चार ते दहा या वयोगटात ज्या उत्स्फूर्त आणि उत्साहाने खेळ खेळण्याची प्रवृत्ती असते. ती तितक्याच संवेदनशीलतेने जपण्याची गरज आहे. आज मैदाने नसल्याने मुले घराच्या बाहेरही पडत नाहीत. मैदानांची जागा मोबाईलवरच्या खेळांनी घेतली आहे. आज अगदी पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची हाती मोबाईल असतात आणि मोबाईलवरचे गेम खेळण्यात त्यांचे तासनतास वाया जात असतात. जर या वयोगटातल्या मुलांचा खेळ हा अधिकार आहे. हे तत्त्व जर मान्य झाले तर घरात मोबाईलवर गुंतून पडणारी मुले मैदानावर निश्चितपणे येतील त्यासाठी सरकारी धोरणांमध्ये खूप मोठ्या बदलांची आवश्यकता आहे. विशेषतः लहान वयातील खेळ खेळण्याच्या या प्रेरणा समाजाच्या उत्तम जीवनमानाशी संबंधित आहेत. हे विसरून चालणार नाही. खेळातून मनाची आणि शरीराचीही जडणघडण होते. या वयात अभ्यासाइतकाच खेळदेखील महत्त्वाचा असतो.